१ जुलै

दिन विशेष

- १९८९ : शिक्षणतज्ज्ञ ग. ह. पाटील यांचं निधन.
- २०१३ : आशियाई अॅथलेटिक्स संघटना अध्यक्षपदाच्या निवडणुकीत सुरेश कलमाडी यांचा पराभव.
- २०१७ : वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) देशभरात लागू.
- २०१८ : चीनलाही माऱ्याच्या टप्प्यात आणणारी 'अग्नी ५' ही आंतरखंडीय बॅलेस्टिक क्षेपणास्त्र यंत्रणा लष्करात समाविष्ट करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आल्याची माहिती.

आरोग्यमंत्र — कर्करोगाला अटकाव?

सध्या कर्करोगाचं प्रमाण वाढलं आहे. मात्र संशोधक सातत्याने या आजाराशी सामना करणाऱ्या उपयुक्त उपचारपद्धती आणि औषधांच्या शोधप्रक्रियेत गुंतलेले आहेत. मध्यंतरीच संशोधकांच्या एका गटाने ब्रेन कॅन्सरवर एक औषध विकसित केलं आहे. यामुळे मेंदूच्या कॅन्सरशी झुंजणाऱ्या रुग्णांच्या चेहऱ्यावर आनंद फुलायला मदत होणार आहे. वेगवेगळ्या औषधांच्या एकत्रीकरणातून तयार झालेल्या नव्या फॉर्म्युल्यामुळे मेंदूच्या विकारांवरचे उपचार अधिक प्रभावी ठरण्याची शक्यता आहे. या प्रयोगामध्ये एमएमएसी मायमेटिक्स आणि आयसीआय यांचे एकत्रित परीक्षण करण्यात आलं. या औषधांच्या एकत्रित

वापरामुळे कॅन्सरच्या पेशी अधिक वेगाने नष्ट होत असल्याचं शास्त्रज्ञांना आढळून आलं आहे. गोळ्या एकत्र घेतल्यानंतर शास्त्रज्ञांनी शरीराची प्रतिकारक्षमता वाढवण्यासंबंधीच्या प्रक्रियेचा शोधही लावलाय. औषधांच्या एकत्रिकरणाच्या या प्रक्रियेतून स्तनाचा कर्करोग आणि मल्टीपल मायलोमा या प्रकारांवरही उपचार होणं शक्य होणार असल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. या संशोधनामुळे इम्युनोथेरपीच्या क्षेत्रात अधिक चांगलं काम होण्याची शक्यता शास्त्रज्ञांनी व्यक्त केली आहे. जगात विविध प्रकारच्या कॅन्सरचं प्रमाण वेगाने वाढत आहे. त्यात ब्रेस्ट कॅन्सरचं प्रमाण सर्वाधिक आहे. त्यामुळे केमोथेरपीसारखे गंभीर उपचार घ्यावे लागतात. पण नव्या पद्धतीमुळे अनेक गोष्टी सोप्या होण्याची आशा आहे.

राशीभविष्य

- **मेष :** महत्त्वाच्या बाबींचा साक्षात्कार होईल. उत्पन्नात मनाजोगी वाढ होत राहील. प्रवास लाभदायक ठरेल.
- **वृषभ :** अनावश्यक खर्चावर नियंत्रण ठेवावं. इतरांकडून फार अपेक्षा ठेवू नका. मानसिक तणाव राहील.
- **मिथुन :** अडकलेली रक्कम वसूल होईल. कामासाठी प्रवास लाभदायक ठरेल. शारीरिक थकवा जाणवेल.
- **कर्क :** किंमती वस्तूंची काळजी घ्यावी. महत्त्वाच्या योजना मार्गी लागतील. कार्यक्षेत्रात प्रगती साधाल.
- **सिंह :** उत्तम धनप्राप्ती होईल. एखाद्या धार्मिक स्थळाची यात्रा घडेल. यांत्रिक क्षेत्रात अनुकूलता राहील.
- **कन्या :** हितशत्रूंपासून सावध रहावं. वाहन, मशिनरी, आगीपासून सावध असावं. प्रकृतीची काळजी घ्या.
- **तूळ :** सरकारी कामात यश मिळेल. उद्योग-व्यवसायात अनुकूलता राहील. भावंडांचं योग्य सहकार्य राहील.
- **वृश्चिक :** अडचणींचा सामना करावा लागेल. देण्या-घेण्याच्या व्यवहारात काळजी घ्यावी. विचारानं रहावं.
- **धनु :** पार्टी किंवा पिकनिकचा बेत ठरू शकेल. बौद्धिक कार्यात यश मिळेल. मानसिक स्वास्थ्य लाभेल.
- **मकर :** बोलताना शब्दांचा वापर जपून करा. मोठी समस्या निर्माण होऊ शकते. प्रवास शक्यतो टाळावा.
- **कुंभ :** लाभाच्या संधी प्राप्त होतील. महत्त्वाच्या कामांना अनुकूलता राहील. अनुभवींचा सल्ला अवश्य घ्या.
- **मीन :** नव्या ओळखी होतील. घरात पाहुण्यांची वर्दळ राहील. अपेक्षित वार्तेने समाधान लाभणार आहे.

परिचय — चिंतनातून तत्व साकार

चांदीच्या आणि सोन्याच्या ठोकळ्याची घनता वेगवेगळी असल्यामुळे त्यांच्या एकाच वजनाच्या ठोकळ्याचं आकारमान वेगवेगळं असतं असं जाणून घेतल्यानंतर आर्किमिडीजने पाण्याने पूर्ण भरलेल्या भांड्यात मुकुटाच्या वजनाएवढ्या वजनाचा शुद्ध सोन्याचा ठोकळा बुडवला. सहाजिकच त्याच्या आकारमानाइतकं पाणी बाहेर सांडलं. आता हाच प्रयोग तेवढ्याच वजनाचा चांदीचा ठोकळा घेऊन आणि त्यानंतर मुकुट घेऊन केला गेला. मुकुट बुडवल्यावर सांडलेल्या पाण्याचं आकारमान हे सोन्याचा किंवा चांदीचा ठोकळा पाण्यात बुडवल्यावर बाहेर सांडलेल्या आकारमानाच्या दरम्यानचं आढळलं. यावरून मुकुट शुद्ध सोन्याचा नसून त्यात चांदीची भेसळ करण्यात आली असल्याचा अचूक निष्कर्ष आर्कीमिडीजने काढला. आर्किमिडीजचं सुप्रसिद्ध तत्त्व याच प्रयोगानंतरच्या चिंतनातून तयार झालं. ते म्हणजे 'एखादी वस्तू द्रवात बुडवली जाते, तेव्हा वजनात जी घट येते, ती घट बाहेर सांडलेल्या द्रवाच्या वजनाएवढी असते'. हे तत्त्व तरंगणाऱ्या वस्तूलाही लागू पडतं.

मनातलं ओठांवर — असह्य होरपळ...

वीस वर्षांच्या त्यांच्या सुखी संसारात अचानक विघ्न येईल आणि एक हसतंखेळतं घर तणावाखाली जाईल असा कोणी विचारही केला नव्हता. पण सुहासची बँकेतली चांगल्या पगाराची नोकरी गेली आणि त्या पाच जणांच्या पायाखालची जमीनच सरकली. दोन मुलं, आई आणि पत्नीला ही बातमी कशी सांगावी हाच त्याच्यापुढे मोठा प्रश्न होता. पण धीर केल्याखेरीज पर्याय नव्हता. मुलांचा शिक्षणखर्च, आईचं आजारपण, घरखर्च हा सगळा डोलारा कसा सांभाळायचा हे मोठं कोडं होतं. सीमा गृहिणी होती. घरातली सगळी कामं बघणं, प्रत्येकाची काळजी घेणं याशिवाय तिला दुसरं विश्व नव्हतं. तीन वर्षांपूर्वी घेतलेलं घर सजवण्याची तिची सगळी स्वप्नंही अद्याप पूर्ण झाली नव्हती. अशी स्थिती असताना ते कितीतरी मोठ्या चक्रव्यूहात अडकले होते याची कल्पनाच केलेली बरी. वरवर हा एका घराचीच नव्हे तर अनेकांची व्यथा आहे. आयुष्याच्या ऐन मध्यावर आर्थिक सावली दूर होते तेव्हा होणारी होरपळ आयुष्य करपवून टाकते हेच खरं...

पंचांग

सोमवार, १ जुलै २०१९
विकारीनाम संवत्सर, शके १९४१, ज्येष्ठ कृ. १४, नक्षत्र : रोहिणी, चंद्रराशी : मिथुन, गंड योग
सूर्योदय : ६.०७, सूर्यास्त : ७.१८

फॉरवर्ड्स

विषय बदलणं ही काहींची खासियत असते नाही...

बात वो कहिए कि जिस बात के सौ पहलू हों
कोई पहलू तो रहे बात बदलने के लिए

स्मार्ट शॉपिंग

एअर फ्रायर हे उपयुक्त उपकरण असलं तरी आपल्यासाठी नेमकं कोणतं मॉडेल अधिक उपयोगी ठरेल याचा अभ्यास केल्यास खरेदी करणं सुकर ठरतं. उदाहरणार्थ काही मॉडेल्समध्ये एका वेळी एकापेक्षा अधिक डिशेस बनवण्याची सोय असते. त्यामुळे नोकरी करणाऱ्या स्त्रियांसाठी हे मॉडेल अधिक उपयुक्त ठरतं. काही फ्रायरर्समध्ये मांस आणि मासे फ्राय करणारी यंत्रणा अधिक उत्तम असते. त्यामुळे आपल्या घरातल्या खाद्यसंस्कृतीनुसार एअर फ्रायर मॉडेलची निवड करणं हा फायद्याचा सौदा ठरतो. तुम्ही ई-कॉमर्स साईटवर वेगवेगळी फीचर्स जाणून घेऊ शकता.

करिअरवाटा — प्रोजेक्टसाठी साह्य करा

थिअरी शिकण्याबरोबर अनुभवही मिळावा या हेतूने अभ्यासक्रमात विविध विषयांचे प्रोजेक्ट करण्यास देण्याचं धोरण आखण्यात आलं आहे. हे प्रोजेक्ट पूर्ण करणं अनिवार्य असल्यानं विद्यार्थी आणि पालकांना बरेच प्रयास घ्यावे लागतात. या पार्श्वभूमीवर प्रोजेक्टसाठी लागणारी सामग्री, प्रोजेक्टची तयारी, मार्गदर्शन आदी पुरवणारं नवं क्षेत्र आकाराला आलेलं असून कारकिर्दीची ही हटके वाट ठरत आहे.

काही प्रोजेक्ट डी.टी.पी. करून सादर करावे लागतात. त्यात चित्र टाकावी लागतात. त्यांचं उत्तम स्पायरल बायंडिंग करावं लागतं. त्यात माहितीच्या झेरॉक्स प्रती जोडाव्या लागतात. ही सगळी कामं करताना विद्यार्थ्यांच्या नाकीनऊ येतं. या कामाची घाई ताण वाढवणारी ठरते. म्हणूनच अशी कामं कोणी आयती करून दिली तर बरी वाटतात. त्यातून प्रोजक्ट डी.टी.पी. करून देण्याचा व्यवसाय किफायतशीर ठरत आहे. सायबर कॅफेतून माहिती काढता येते आणि फोटोसुद्धा काढता येतात. बायंडिंग करणारेही अनेक लोक आहेत. परंतु या प्रत्येक कामासाठी चार दुकानात फिरून विद्यार्थ्यांची दमणूक होते. हे लक्षात घेऊन ही सारी कामं एकाच ठिकाणी देण्याची व्यवस्था केली तर तुम्ही उत्तम अर्थार्जन करू शकता.

खेचाखेची — सतर्क रहा

हवामान खात्याने वर्तवलेला अंदाज सगळ्या पुरुषांनी लक्षात घ्यायला हवा.
.
.
.
.
.
.
.
या अंदाजानुसार...
ह्या आठवड्यात माहेरी गेलेली वादळं घराच्या उंबऱ्याशी येऊन धडकणार आहेत. त्यामुळे सतर्क रहावं...

जीके टेस्ट

१) कोलंबिया कधी स्वतंत्र झाला?
२) वीर सावरकर आंतराष्ट्रीय विमानतळ कुठे आहे?
३) जगातील सर्वात जुनं थिएटर कोणतं?
४) पहिला भारतीय अंतराळवीर कोण? राकेश शर्मा
५) 'देवाचं निवासस्थान' अशी कोणत्या तीर्थक्षेत्राची ओळख आहे?

उत्तरं
१) २० जुलै १८१० २) अंदमान-निकोबार द्वीप समूहांवर ३) टॅरो ऑलिंपिक, इटली ४) राकेश शर्मा ५) प्रयाग

फॅशन पॅशन — प्रावरणांमधील सप्तरंग

उन्हाळा संपून पावसाळा सुरू होण्याच्या या ऋतूबदलाच्या काळात प्रावरणांच्या रंगांमध्येही बदल करावा लागतो. यंदाच्या सीझनमध्ये कोणते कलर्स ट्रेंडमध्ये आहेत यावर एक नजर टाकू.

✲ मरून– प्रत्येक ड्रेस टाईपमध्ये या रंगाचं वेगळं स्थान आहे. या मान्सूनमध्येही हा रंग जलवा दाखवत आहे. या रंगाच्या शेड्सनी मनावर अधिराज्य गाजवायला सुरुवात केली आहे. या रंगामध्ये मॅक्सी, जंपसूट, ऑफ शोल्डर टॉप, रफल्स टॉप, कोल्ड शोल्डर टॉप आणि शॉर्ट ड्रेस ट्रेंडमध्ये आहेत. ✲ ग्रीन शेड– ताजेपणाचं प्रतीक म्हणजे ग्रीन शेड. हा रंग प्रत्येक वर्णाच्या व्यक्तीला खुलून दिसतो. यात वॉर्म टोनमध्ये मस्टर्ड ग्रीन कलर, खाकी आणि डार्क ग्रीन कलर पसंत केले जात आहेत. ट्रेंड्या विचार कराल तर ब्राईट ग्रीन किंवा पॅरेट ग्रीन कलरला महिलांची पसंती आहे. ✲ पीच– काही फॉर्मल इव्हेंट्सना क्लासिक लूक हवा असेल तर हा कलर बेस्ट आहे. पीच कलरचा बेल स्लीव्हजचा ड्रेस खास लूक देऊ शकतो. ✲ चॉकलेट ब्राऊन– हा रंग तरुणींच्या स्टायलिंगमध्ये नव्याने दिसून येत आहे. या सीझनमधल्या पार्टीसाठी चॉकलेट ब्राऊन कलरचा गाऊन हा सर्वोत्तम पर्याय आहे.

सुडोकू – ११२१

६	२		५	३				
	५		२		१	९		७
	१				४			
	६							५
			१		३			
७							४	
			४				८	
१		५	३		२		६	
				८	५		९	१

टीप –
✲ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ x ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
✲ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
✲ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

सुडोकू – ११२० चे उत्तर

७	८	९	१	६	४	३	२	५
३	२	१	८	७	५	९	४	६
५	६	४	३	९	२	८	१	७
१	३	६	२	८	९	७	५	४
९	५	७	६	४	३	१	८	२
८	४	२	७	५	१	६	९	३
६	९	३	४	२	८	५	७	१
४	१	५	९	३	७	२	६	८
२	७	८	५	१	६	४	३	९

महाशब्दकोडे क्रमांक ११२१

आडवे शब्द :–
१) पाषाण
३) भयानक
६) जिम्मेदार
१०) बेदाणा
११) क्षुद्र, नीच, तेजोहीन
१३) धपाटा
१४) व्यय
१५) प्रभात
१७) नाला, ओढ्यावरील कच्चा पूल
१९) मत्सर
२०) घर
२३) वकिलाचे काम
२५) मातृभाषा
२७) हाडांचा सापळा
२९) दुर्योधनाचा जिवलग मित्र
३०) दरवाजा
३२) दैव
३४) समतल
३६) पंख
३७) विश्व
४१) सोन्याचा धागा
४२) गाय
४३) पाहुणचार,
४६) गाण्याची बैठक
४८) सीमा, मर्यादा
५०) माया, प्रेम
५१) श्वासोच्छ्वास
५२) सिंह
५४) लोक, प्रजा
५६) माल साठविण्याची जागा
५८) नीच, पाषाणहृदयी
६०) पाणी
६१) भुझा
६२) मनाचा झालेला ग्रह
६३) लक्ष्मीचे एक नाव
६५) हाक
६६) दावा लावणारा, वैरी
६७) कबूतर
६९) साय
७०) घागरा
७२) शृंगार(ग्रा)
७४) पत्र
७५) मिठी
७६) पातक
७७) शोध
८०) अंकुर
८१) आश्रय
८२) इंद्रिय, घटक
८३) एक प्रश्नार्थक शब्द
८४) कशा प्रकारचा, बटवा

उभे शब्द: –
१) कोवळ्या दुधाचा (चिकाचा) गोड पदार्थ
२) राजीवनयन
३) उजाड, खिन्न, ओसाड
४) ललाट
५) दारूचा एक प्रकार
७) पायविहीर
८) कलंक, डाग
९) पहारेकरी
१२) पृथ्वी
१६) शरीर
१८) विद्या
१९) हट्ट
२१) एक श्वासरोग
२२) नातेवाईक
२३) रंग
२४) होडी
२६) नम्र, वाकलेला
२७) भोळा
२८) मच्छर
२९) कारस्थान
३१) संध्याकाळ
३३) धमनी
३५) बासरी
३६) उद्याच्या नंतरचा दिवस
३८) उष्ण
३९) भडीमार
४०) आजच्या आधीचा दिवस
४१) वृद्धत्वाने पीडलेला
४४) धोंग, थाप
४५) भगवान
४६) जन्ममृत्यू
४७) दक्ष
४८) पारा
४९) रात्र
५३) नमन
५५) नमते धोरण
५७) संसद सदस्य
५९) गवंडी
६१) मान, प्रतिष्ठा
६२) शंकराचे एक नाव
६४) तालुक्याचे वसुलीचे काम
६५) एक बैठा खेळ
६७) झाडावरील मोठा कट्टा
६८) वितरण
७१) खण
७३) गर्दभ
७५) मडके
७६) एक चतुर्थांश भाग
७८) पवित्र
७९) खरगोश, एक प्राणी

(उत्तर उद्याच्या अंकात)

कालच्या महाशब्दकोड्याचे उत्तर